१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा रचना सहाय्यक, सहाय्यक संचालक नगर रचना कार्यालय, धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. सहाय्यक संचालक, सहाय्यक संचालक नगर रचना कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-----6900----- दिनांक :-----26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७७३३/२०२४**
**बोर्ड क्र.०८**

श्री. सुभाष बाबुराव जाधव, अपिलार्थी
रा. छोरीया टाऊनशिप कुर्डूवाडी, जि. सोलापूर.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
आस्थापना विभाग, नगर परिषद, धाराशिव (उस्मानाबाद)

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, धाराशिव (उस्मानाबाद)

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत तसेच अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (प्रथम अपिलीय अधिकारीयांचे प्रतिनिधी यांनी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०२.२०२४ | श्री. रविंद्र दिगंबर वाघमारे यांचे मूळ नियुक्ती पासून ते आजपर्यंत सर्व नोंदी केलेल्या सेवा पुस्तकाची मूळ सत्यप्रत मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती देता येणार नाही असे कळविलेले आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०१.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकरी यांनी दि.२३.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सविस्तरपणे उत्तर दिल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.०४.२०२४ रोजी दिलेला निर्णय बाजूला सारण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आयोगास योग्य दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना सविस्तरपणे कळविलेले असल्यामुळे अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तिवादात तथ्यांश दिसून येत नाही. यासर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.: 6828 दिनांक :- 26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६२३५/२०२४**
**बोर्ड क्र.०९**

श्री. प्रशांत बाबासाहेब बनसोडे, — अपिलार्थी
रा. अजिंठा नगर, अस्मिता निवास, धाराशिव (उस्मानाबाद)

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०२.२०२४ | जानेवारी २०२० ते आजतागायत १. बहुजन एकता विकास परिषदेने शहरातील विविध मागण्या तसेच विविध समस्येबाबत मुख्याधिकारी यांच्या नावाने दिलेल्या सर्व निवेदनाच्या सत्यप्रती देणे.२. बहुजन एकता विकास परिषदेच्या वतीने दिलेल्या सर्व निवेदनात (वेगवेळया विषयासंबंधी तक्रारी अर्जासह) मुख्याधिकारी किंवा त्यांच्या विषयाशी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांनी लेखी स्वरुपात केलेल्या कार्यवाहीच्या सत्यप्रती देणे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना दि.१५.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती

उपलब्ध करुन दिलेली आहे . अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही व कोणताही आदेश काढलेला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती मोघम, विस्तृत व मोठया कालावधीची मागणी केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केल्या माहिती मध्ये कोणतेही जनहित दिसून येत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१५.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली असून अपिलार्थी यांनी ती माहिती स्वीकारुन पोहच दिल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 6829 दिनांक :- 26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६४३५/२०२४**
**बोर्ड क्र.१०**

श्री. बाळासाहेब वसंतराव सुभेदार, — अपिलार्थी
रा. छत्रपती संभाजीराजे कॉलनी, जाधववाडी रोड, धाराशिव (उस्मानाबाद)-४१३ ५०१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कर निर्धारक व प्रशासकीय अधिकारी, आस्थापना विभाग,
नगर परिषद, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.०१.२०२४ | १५ जुलै २०१९ ते आजपर्यंत या कालावधीतील अनुसूचित जाती नवबौध्द घटकांच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी प्राप्त झालेल्या निधीमधून नवबौध्द घटकांच्या वस्तीमध्ये खर्च न करता सुवर्णाच्या वस्तीमध्ये निधी खर्च करुन शासनाच्या महत्वकांक्षी योजनेला हरताळ फासलेबाबतच्या प्रकणात पुनरविचार करणेबाबत |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावी, तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम

अपिलीय अधिकारी यांचेवर शास्ती व शिस्त भंगाची कार्यवाही करावी.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१०.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात उपलब्ध असेलेली व देय होणारी माहिती दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जाणुनबुजून हेतुपरस्सर अपूर्ण माहिती दिलेली आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपुर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, **प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१५.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिल्याचे दिसून येत आहे.** अपिलार्थी यांना प्राप्त झालेल्या माहितीबाबत त्यांना तक्रार असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थी यांचा युक्तिवाद व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6830 दिनांक : 26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८२९८/२०२४**
**बोर्ड क्र.११**

श्री. अतकरे महेश चंद्रकांत, — अपिलार्थी
रा. शिवनेरी नगर,सोलापूर-छत्रपती संभाजीनगर हायवे,
पंडित किराणा स्टोअर्स जवळ, धाराशिव,
ता.जि. धाराशिव-४१३५०१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना दि.१७.०६.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन वेळ व दिनांक नमूद करुन स्वाक्षरी केलेली आहे. ती पोहच आयोगास सादर केले.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.१७.०६.२०२५ रोजीचे पोहच विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रकाश

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 6831 दिनांक : 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०५७९/२०२४**
**बोर्ड क्र.१२**

श्री. मोहनराव दत्तात्रय देशपांडे, — अपिलार्थी
रा. न.प.शाळा नं.११ चे समोर,
श्री. मुगे यांचावाडा, धाराशिव (उस्मानाबाद)

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
सेवा निवृत्ती विभाग, नगर परिषद, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०७.२०२४ | सन २०२१ ते २०२४ या कालावधीतील, सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना देय असणारी निवृत्त झालेनंतर (ग्रॅज्युटी, रजा रोखीकरण इत्यादी) आज तागायत देय असणारी रक्कम दिल्याचे नावासह, एक लाख व पन्नास हजार दिल्याच्या संपूर्ण यादी देण्यात यावी शासन निर्णयानुसार सातवा वेतनाची सदरील देयके कोणत्या फंडातून देण्यात आले आहेत त्याची खुलासेवार माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यन जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, काही कारणास्तव माहिती देण्यात उशिर झालेला आहे. माहिती संकलीत करुन दि.११.०६.२०२५ रोजी

नोंदणीकृ टपालाद्वारे अपिलार्थीस माहिती पाठविलेली होती. तथापि सदरील व्यक्ती पत्ता बदलून गेली असल्याने सदरचे पोस्टाचे पाकीट परत असा उल्लेख करुन कार्यालयाकडे परत केली आहे. ती माहिती आज रोजी सोबत आलेली आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस देण्यात येईल.

आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी राहण्यचा पत्ता बदल झाल्याचे मान्य केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली अपिलार्थी यांनी आयोगासमक्ष माहिती स्वीकारली आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना सुनावणीदरम्यान माहिती देण्यात आलेली असल्यामुळे अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेतल आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6832 दिनांक : 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६२२५/२०२४**
**बोर्ड क्र.१३**

श्री. दहेलुस महंमद सालम, — अपिलार्थी
रा. निजामपुरा गल्ली परंडा,
ता. परंडा, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय,परंडा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद परंडा, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०३.२०२४ | १. मंडई पेठ येथील मुर्लीधर नामदेव परिट यांना किरायावरील जागा क्र.४-६ ही दुकानासाठी ६बाय १० जागा दिलेली आहे. आशा जागा असताना पुर्व-पश्चिम ३० फुट व उत्तर दक्षिण १२ फुट आशी वाटणी अशी व त्याची नोंद झा ाली कशी व किराया किती संपूर्ण माहिती देणे.<br>२. मुर्लीधर यांची सुन कमल सुरेश सोनमुखा यांनी जागा क्र.४-६ ही उपनगर अध्यक्षा मन्नाबी मतीन जिवेरी यांचा मुला वसिम मतान जिवेरी यांना खरेदी दिली व नगर परिषद मध्ये नोंद लावली चार पाच वर्षानंबर उपनगर अध्यक्षा यांनी ती जागा श्रीमती इमाम कलीम विजापुरे याना खरेदी दिली व नगर परिषद मध्ये जागोची नोंद लावली किरायावरील जागेचे खरीदया व नोंदी लागल्या कशा याची माहिती देण्यात यावी. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी नेमका कालावधी नमूद न करता मोघम विस्तृत व्यापक माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशा माहितीने कोणते जनहित साध्य होणार आहे, अपिलार्थी त्यांनी त्यांच्या द्वितीय अपिलात नमूद केलेले नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) मध्ये माहितीची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येनुसार माहिती तयार करुन, माहितीचे संस्करण करुन, इतर कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेऊन, लेखी, खुलासे वजा, स्पष्टीकरण मागणारी इ. माहिती देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीचा अर्ज ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त होतो, त्यावेळी जी माहिती त्यांच्या कार्यालयात ज्या स्थितीत उपलब्ध असते, ती माहिती त्याच स्थितीत अपिलार्थीस देय होते. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्र. २।।३)

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6833 दिनांक : 26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १५५९ ते १५६०/२०२४,**
**१५७४ ते ४७७५/२०२४**

**बोर्ड क्र.१४ते १७**

श्री. चनबसप्पा तमणप्पा घोंगरे, — अपिलार्थी
रा. २०३ पुर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४३१००१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कार्यालयीन अधिक्षक,
नगर पंचायत कार्यालय, लोहारा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगरपंचायत, लोहारा, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२६.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये चार द्वितीय अपिले दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.१२.२०२३ | नगर पंचायत कार्यालय लोहारा बु. येथील डॉ. आंबेडकर चौक जुना तलाव येथील बागबगिचा शिशोभिकरण (नाना नानी पार्क) बाबत संपूर्ण सचिका सत्यप्रतीत मिळणेबाबत कामाचे अंदाजपत्रक, कार्यारंभ आदेश बांधकाम नकाशा ले आऊट इतर सर्व संबंधीत अभिलेख सत्यप्रतित मिळणेबाबत. |
| ०६.१२.२०२३ | नगर पंचायत कार्यालय लोहारा बु येथील डॉ. आंबेडकर चौक येथील नविन नगरपंचायत प्रशासकीय इमारत बांधकामबाबत संपूर्ण संचिका सत्यप्रतित मिळणेबाबत, कामाचे अंदाजपत्रक, कार्यारंभ आदेश, वर्क ऑर्डर, बांधकाम नकाशा व ले आऊट इतर सर्व अभिलेख सत्यप्रतित मिळणेबाबात. |

| | |
|---|---|
| २१.०२.२०२४ | दि.०१.०१.२०१८ ते आजपर्यंत या कालावधीतील नगरपंचायत कार्यालय लोहारा बु. ता. लोहारा जि. उस्मानाबाद विविध सर्व विभागाकडून जाहीर प्रसिध्दीकरणबाबत संपूर्ण संचिका सत्यप्रत मिळणेबाबत. |
| २१.०२.२०२४ | दि.०१.०१.२०१८ ते आजपर्यंत या कालावधीतील नमूद कालावधीत नगरपंचायत कार्यालय, लोहारा बु., ता. लोहारा जि. धाराशिव येथे सर्व प्राप्त निधी खर्च याबाबत सर्व अभिलेख, सत्यप्रतित मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना दि.१५.०६.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे. ती पोहच आयोगास सादर केले.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद व अपिलार्थी यांनी दि.१५.०६.२०२५ रोजी दिलेली पोहच व लेखी निवेदन विचारात घेता, विचाराधिन चार व्दितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांचे चार द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6834 दिनांक : 26/06/202५

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४१७०/२०२४
बोर्ड क्र.१८

श्री. दत्तात्रय शरणच्या स्वामी, — अपिलार्थी
मु. पो. गणेश चौक, लोहारा (बु.),
ता. लोहारा, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर पंचायत कार्यालय, लोहारा बु.,
ता. लोहारा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, लोहारा बु.,
ता. लोहारा, जि. धाराशिव

(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२६.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.१२.२०२३ | नगरपंचायत वरिष्ठ कार्यालयाने केलेले आदेश व त्यांचे रेट म्हणजे कुडाचा घरास किती, पत्रा शेड किती लोड बेरींग किती, ओपन स्पेस, खुला प्लॉट किती, आरसीसी अथवा नगरपंचायत कर मुल्यांकन बाबत इतर अन्य काही रेट पत्रक असतील त्या संदर्भात सर्व कागदपत्रे सत्यप्रतीत मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना दि.१७.०१.२०२३ रोजी माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळालेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादात तथ्यांश दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी विस्तृत, मोघम स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. नेमका कालावधी नमूद केलेला नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) मध्ये माहितीची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येनुसार माहिती तयार करुन, माहितीचे संस्करण करुन, इतर कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेऊन, लेखी, खुलासे वजा, स्पष्टीकरण मागणारी इ. माहिती देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीचा अर्ज ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त होतो, त्यावेळी जी माहिती त्यांच्या कार्यालयात ज्या स्थितीत उपलब्ध असते, ती माहिती त्याच स्थितीत अपिलार्थीस देय होते. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलाथी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6835 दिनांक : 26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -६८२४/२०२४ व ६८२५/२०२४**
**बोर्ड क्र.१९ व २०**

श्री. प्रताप रामराव घोडके, — अपिलार्थी
मु. पो. लोहारा बु., ता. लोहारा, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर पंचायत कार्यालय, लोहारा बु.,
ता. लोहारा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर पंचायत लोहारा बु.,
ता. लोहारा, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२५.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०३.२०२४ | १. लोहारा वार्ड मधील चालू असलेल्या सिमेंट रस्ता, नाली, स्टेट लाई या कामाचे इस्टीमेंट व वर्कऑर्डर, प्रशासकीय मान्यता यांची साक्षांकित झेरॉक्स प्रती मिळाव्यात. २. सिमेंट रस्ता, नाली, स्टेटलाई हि कामे सुरु झाल्यापासूनचे जी पी एस मॅपचे फोटे मिळावेत, मजबुतीकरण, बेड, रस्ता क्रॉकीट, नालीच्या सर्व भागाचे, स्टेटलाईच्या कामांचे फुटींग बेड. |
| २८.०३.२०२४ | १. लोहारा शहरामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अंतर्गत स्वच्छता करणाऱ्या ठेकेदाराला देण्यात आलेल्या मुळ वर्कऑर्डर प्रशासकीय मान्यतेची साक्षांकित प्रती २.नगर पंचायतची मुळ वर्कऑर्डर पासून संबंधीत ठेकेदाराला वाढवून देण्यात आलेल्या सर्व कार्यारंभ व |

| | |
|---|---|
| | प्रशासकीय मान्यता याची साक्षांकित प्रती व ठराव प्रती शासन निर्णयासह मिळाव्यात ३. नगर पंचायतला किती वर्षे व महिने ठेकेदाराला ठराव घेवून वाढवून देता येते याची लेखी माहिती ठरावासह शासन निर्णयासह देण्यात यावी ४.सन २०२१ ते २०२४ पर्यंतच्या काळातील माहिती देण्यात यावी ५. स्वच्छ महाराष्ट्र अंतर्गत देण्यात आलेल्या वर्कऑर्डरला व प्रशासकीय मान्यता देणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांची नावासह माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात व्यक्तिश: माहिती मागितलेली असल्याने माहिती तयार करुन कार्यालयात ठेवलेली होती. तथापि अपिलार्थी व्यक्तिश: कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. पोस्टाने माहिती पाठविली की माहिती स्वीकारत नाहीत ते कार्यालयास परत पाठवितात. आज रोजी माहिती संकलीत करुन सोबत आणलेली आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यात येईल.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की,अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, पैसे भरुन न घेणे व माहिती उपलब्ध करुन न देणे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती मिळालेली नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला आदेश कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर पंचायत कार्यालय, लोहारा बु., ता. लोहारा, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. मुख्याधिकारी, नगर पंचायत लोहारा बु., ता. लोहारा, जि. धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6836 दिनांक : 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५६३३/२०२४**
**बोर्ड क्र.२१**

श्री. आबासाहेब धोंडीराम मस्कर, — अपिलार्थी
रा. मस्कर गल्ली, भूम, ता. भूम, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी; — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद, भूम, ता.भूम, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, भूम, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.१२.२०२३ | मार्च २०१७ ते मार्च २०१९ मध्ये नगर परिषद हद्दीतील मंजूर करण्यात आलेलया गुंठेवारी धारकांची यादी २. गुंठेवारी मंजूर करताना घेतलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितलेली असल्यामुळे त्यांना दि.२१.०१.२०२४ रोजीच्यापत्रान्वये सविस्तरपणे कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१५.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशीत आदेशीत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटा, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही याबाबीची आयोगाने गंभीर दखल घेतलेली आहे. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येते आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद, भूम, ता.भूम, जि. धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, भूम, जि. धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.--6837-------------- दिनांक :- 26/06/2024

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५६३४/२०२४ ते ५६३७/२०२४**
**बोर्ड क्र.२२ ते २५**

श्री. चंद्रमणी गोरख गायकवाड, — अपिलार्थी
रा. भिमनगर, भूम,
ता.भूम, जि. धाराशिव (उस्मानाबाद)

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद, भूम, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, भूम, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये चार द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी चार जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.१२.२०२३ | सन मार्च २०१७ ते सप्टेंबर २०२३ या कालावधीतील १ भूम नगर परिषद हद्दीतील वरील कालावधीत मंजूर करण्यात आलेल्या गुंठेवारी धारकांची यादी २. त्यांच्या क्षेत्राची यादी ३. सर्व्हे नं ची यादी ४. गुंठेवारी धारकांना दिल्या गेलेल्या गुंठेवारी कराच्या पावत्याच्या सत्यप्रती मिळणेबाबत. |
| १४.१२.२०२३ | सन मार्च २०१७ ते डिसेंबर २०२३ या कालावधीतील १. भूम नगर परिषद स्वच्छतेसाठी घनकचरा टेंडर दिले आहे त्या संस्थेचे नांव २. सफाई कर्मचारी यांची नांवे ३. सफाई कर्मचारी यांना दिलेल्या वेतन रजीस्टरच्या सत्यप्रती ४. सफाई कर्मचारी यांचा भरलेले भविष्य निर्वाह निधी, पीएफ, च्या कपाती सत्यप्रती मिळणेबाबत. |

| | |
|---|---|
| १८.१२.२०२३ | जानेवारी २०१२ ते डिसेंबर २०२३ या कालावधीतील भूम नगर परिषदेमार्फत मच्छरसाठी शहरात नालीवर टाकण्यात आलेली पावडर व धुरण्यासाठी वापरण्यात येणारे लीक्वीड खरेदी केलेल्या जीएसटी च्या बीलाच्या पावत्याची सत्यप्रत मिळणेबाबत. |
| १४.१२.२०२३ | मार्च २०१७ ते डिसेंबर २०२३ या कालावधीतील भूम नगर परिषद मार्फत मुख्याधिकारी नगर अभियंता कर्मचारी व इतर सन्माननीय नगराध्यक्ष पदाधिकारी, नगरसेवक यांनी वाहनात वापरलेल्या डीजेलच्या जीएसटी व्हाऊचरच्या सत्यप्रती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना दि.२१.०१.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस दि.२२.०४.२०२४ रोजीच्यापत्रान्वये सविस्तरपणे कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी हे वारंवार सारखे माहिती अर्ज कार्यालयाकडे करतात.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी याच्या प्रथम अपिलवर १५.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ केल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केलेली आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही आयोगास योग्य दिसून येत आहे. आयोगाच्या असेही निदर्शनास आलेले आहे की, अपिलार्थी हे वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे अर्ज करत आहेत. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे चार द्वितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अतः आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांचे चार द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांना निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाची जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा धाराशिव यांचेमार्फत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर आदेश आपल्या अधिनस्त कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात यावा.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 6896 दिनांक :- 26/06/2025

प्रत : माहितीसाठी तथा यथाशिघ्र कार्यवाहीसाठी अग्रेषित
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५६३८/२०२४ व ५६३९/२०२४**
**बोर्ड क्र.२६ व २७**

श्री. संतोष सुपेकर, — अपिलार्थी
रा. नागोबा गल्ली भूम,
ता. भूम, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद भूम, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद भूम, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दोन्ही जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.१२.२०२३ | मार्च २०१७ ते ३० नोव्हेंबर २०२३ या कालावधीतील १.नगर परिषद हद्दीतील मंजूर करण्यात आलेल्या गुंठेवारी धारकांची नांवे व यादी मिळणेबाबत २. गुंठेवारी मंजूर करताना घेतलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती मिळणेबाबत. |
| १८.१२.२०२३ | सन २०१२ ते डिसेंबर २०२३ भूम नगर परिषदेमार्फत खाजगी संस्थेला घनकचरा उचलण्यासाठी टेंडर दिलेले आहे त्या संस्थेतील मजूरांची टिपर कागदपत्रे, त्यांचा भरलेला भविष्य निर्वा निधी व संस्थेकडून महिन्याला नगर परिषदेला मागणी केलेली बीले व नगर परिषदेने संस्थेला दिलेल्या बिलांच्या सत्यप्रती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली असल्याने त्यांना दि.२२.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, कलम ८(१) अन्वये त्रयस्थ पक्षकाराची माहिती देता येत नाही असे सविस्तरपणे कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने सविस्तरपणे कळविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद यांचा सारासार विचार करता जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आयोगास योग्य दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 7347 दिनांक :- 02/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ००१३/२०२४ व १२२१/२०२४**
**बोर्ड क्र.२८ व २९**

श्री. श्रीशैल मल्लिनाथ मेंगाणे, — अपिलार्थी
द्वारा- इरप्पा म.पाटील, सी-६१,
श्रीलैश नगर, भवानी पेठ, सोलापूर-४१३ ००२

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कार्यालयीन अधिक्षक, नगर परिषद कार्यालय मुरुम,
ता. उमरगा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, मुरुम,ता. उमरगा, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी प्रथम अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांचे दि.०७.०८.२०२४ रोजी निधन झालेले आहेत. त्यांचा मृत्यू दाखल सादर केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद पाहता, त्यांनी आयोगाच्या पटलावर सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांचे निधन झाल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6897 दिनांक : 26/06/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २३१७/२०२४**
**बोर्ड क्र.३०**

श्री. हिरेमठ सिध्दलिंग राजशेखर, — अपिलार्थी
मु. पो. यशवंतनगर ज्ञानदान विद्यालय, पाठीमागे, मुरुम,
ता. उमरगा, जि. धाराशिव-४१३६०५

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, मुरुम,
ता. उमरगा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद मुरुम, ता. उमरगा, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२६.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी यांचे विधीज्ञ उशिराने उपस्थित आहेत. (तथापि अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०१.२०२४ | सन २०१८-२०१९ ते २०२२-२०२३ असे पाव वर्षाचे मुरुम शहरात सिमेंटरस्त्याच्या केलेल्या कामाचे प्लॅन व इस्टीमेंट (अंदाजपत्रक व आराखडा) व तसेच निविदा प्रक्रियेबाबत व सदर कामाचे ठेकेदाराबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना दि.१७.०६.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे. ती पोहच आयोगास सादर केले.

अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी उशिराने उपस्थित राहून अवगत केले की, अपिलार्थी यांना अपुर्ण माहिती मिळालेली आहे. पुढील तारीख देण्यात यावी अशी आयोगास विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद विचारात घेता, अपिलार्थी यांनी दि.१७.०६.२०२५ रोजी माहिती स्वीकारुन पोहच दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांच्या विनंती मध्ये तथ्यांश दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी व्यक्तीश: माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7348 दिनांक :- 02/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक १०६४६/२०२४ ते १०६५३/२०२४**
**बोर्ड क्र.३१ ते ३८**

श्री. आमेर सरदार शेख, — अपिलार्थी
रा. रहिम नगर रोड, डी. एड कॉलेजच्या बाजुला घर नं.१०१,
इनामदार गल्ली नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, नळदुर्ग,
ता. तुळजापूर, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, नळदुर्ग,
ता. तुळजापूर, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये आठ व्दितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय |
|---|---|---|---|
| ३१ | १०६४६/२०२४ | ०२.०९.२०२४ | सन २०२४ ते आजपर्यंत या कालावधीतील नळदुर्ग नगर परिषद वतीने (आण्णाभाऊ साठे नगरी वस्ती सुधारयोजना) साठे नगर येथे समाज मंदिर ते डीपी रोड पर्यंत सिमेंट रस्ता व पायरी बांधकाम करणे त्यासाठी देण्यात आलेल्या निविदा ठेकेदाराचे नाव, करार पत्र वर्कऑर्डर इस्टीमेट पेपर काम सुरु करण्यापुर्वीचे फोटो निवेदा काडताना दैनिक पेपरमध्ये देण्यात आलेले जाहिरातीची कॉपी या सर्व विषयास तपसीलवार |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | माहिती अवलोकन होऊन हवी असलेली माहिती मिळणेबाबत. |
| ३२ | १०६४७/२०२४ | ०२.०९.२०२४ | सन २०२४ ते आजपर्यंत या कालावधीतील नळदुर्ग नगर परिषद वतीने (आण्णाभाऊ साठे नगरी वस्ती सुधार योजना) इंदिरानगर येथे तुकाराम गायकवाड घरटे शंकर वाघमारे घरापर्यंत सीसी रस्ता व गटार बांधकाम करणे त्यासाठी देण्यात आलेल्या निविदा ठेकेदाराचे नाव, करार पत्र वर्कऑर्डर इस्टीमेंट पेपर काम सुरु करण्यापूर्वीचे फोटो निवेदा काडताना दैनिक पेपर मध्ये देण्यात आलेले जाहिरातीची कॉपी या सर्व विषयास तपसीलवार माहिती अवलोकन होऊन हवी असलेली माहिती मिळणेबाबत. |
| ३३ | १०६४८/२०२४ | ०२.०९.२०२४ | सन २०२४ ते आजपर्यंत या कालावधीतील नळदुर्ग नगर परिषद वतीने (आण्णाभाऊ साठे नगरी वस्ती सुधार योजना) इंद्रा नगर येथे मुकुंद कांबळे ते आप्पा सोनटक्के घरापर्यंत सीसी रस्ता व गटार बांधकाम करणे त्यासाठी देण्यात आलेल्या निविदा ठेकेदाराचे नाव, करार पत्र वर्कऑर्डर इस्टीमेंट पेपर काम सुरु करण्यापूर्वीचे फोटो निवेदा काडताना दैनिक पेपर मध्ये देण्यात आलेले जाहिराती चि कॉपी या सर्व विषयास तपसीलवार माहिती अवलोकन होऊन हवी असलेली माहिती मिळणेबाबत. |
| ३४ | १०६७९/२०२४ | ०२.०९.२०२४ | सन २०२४ ते आजतागायत या कालावधीत नळदुर्ग नगर परिषद वतीने (आण्णाऊ भाठे नगरी वस्ती सुधार योजना) भीम नगर येथे खंडू गायकवाड ते बनसोडे समशानभूमीपर्यंत सिमेंट रस्ता व गटार बांधकाम करणे त्यासाठी देण्यात आलेल्या निविदा ठेकेदाराचे नाव, करार पत्र वर्कऑर्डर इस्टीमेट पेपर काम सुरु करण्यापूर्वीचे फोटो निविदा काडताना दैनिक पेपर मध्ये देण्यात आलेले जाहिरातीची कॉपी या सर्व विषयास तपशीलवार माहिती अवलोकन होऊन हवी असलेली माहिती मिळणेबाबत. |
| ३५ | १०६५०/२०२४ | २६.०८.२०२४ | सन २०२४ ते आजपर्यंत या कालावधीतील नळदुर्ग नगर परिषद्च्या वतीने आण्णाभाऊ साठे नगरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत साठे नगर येथे सभा मंडप व सार्वजनिक शौचालय बांधकाम करण्यासाठी देण्यात आलेला निविदा ठेकेदाराचा नाव करारपत्र, वर्क ऑर्डर, एस्टीमेंट पेपर, काम सुरु करण्यापुर्वीचे फोटो निवेदा काढतांना दैनिक पेपर मध्ये देण्यात आलेले जाहिरातची कॉपी या सर्व विषयास तपशीलवार माहिती अवलोकन होऊन हवी असलेली माहिती मिळणेबाबत. |
| ३६ | १०६५१/२०२४ | २६.०८.२०२४ | सन २०२४ ते आजपर्यंत या कालावधीतील नळदुर्ग नगर परिषदच्या वतीने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथान महाअभियान योजने अंतर्गत अक्कलकोट रोड ते बी.के. फक्शन हॉल मार्गे अबुल बरकात मस्जीद पर्यंतसिमेंट रस्ता व |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | गटार काम करण्यासाठी देण्यात आलेला निविदा ठेकेदाराचे नाव करारपत्र, वर्कऑर्डर, ईस्टीमेंट पेपर, काम सुरु रकण्यापुर्वीचे फोटो निवेदा काढतांना दैनिक पेपर मध्ये देण्यात आलेले जाहिरातीची कॉपी या सर्व विषयास तपशीलवार माहिती अवलोकन होऊन हवी असलेली माहिती मिळणेबाबत. |
| ३७ | १०६५२/२०२४ | २६.०८.२०२४ | सन २०२४ ते आजपर्यंत या कालावधीतील नळदुर्ग नगरपरिषदेच्या वतीने आण्णाभाऊ साठे नगरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत भीमनगर येथे बुध्द विहार समोर सार्वजनिक सभागृह बांधकाम करण्याठी देण्यात आलेला निविदा ठेकेदाराचा नाव करारपत्र,वर्कऑर्डर इस्टीमेंट पेपर, काम सुरु करण्यापूर्वीचे फ़ोटो निवेदा काढतांना दैनिक पेपर अवलोकन होऊन हवी असलेली माहिती मिळणेबाबत. |
| ३८ | १०६५३/२०२४ | २६.०८.०२४ | सन २०२४ ते आजतागायत या कालावधीतील नळदुर्ग नगर परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथान महाअभियान योजने अंतर्गत प्रभाग क्र.३ मधील जुनेदी घर ते अंबाबाई मठापर्यत रस्ता कॉक्रीट करण्यासाठी देण्यात आलेला निविदा ठेकदाराचा नाव करारपत्र, वर्क ऑर्डर, इस्टीमेंट पेपर काम सुरु करण्यापूर्वीचे फोटो निवेदा काढतांना दैनिक पेपर मध्ये देण्यात आलेले जाहिरातीची कॉपी व सर्व विषयास तपशीलवार माहिती अवलोकन होऊन हवी असलेली माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अर्धवट दिलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली पुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना वेळोवेळी माहिती दिलेली आहे. तसेच शुल्काचा भरुणा करुन माहिती हस्तगत करावी असे कळविले असता, त्यांनी शुल्काचा भरलेला नाही. तरीपण अपिलार्थी यांना मोफत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी हे वारंवार माहितीचे अर्ज दाखल करतात. तथापि कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती संकलीत करुन आज रोजी सोबत आणलेली आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यात येईल.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्यामुळे नजर चुकीने प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती अपुर्ण मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. तसेच सर्व प्रकरणातील कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुन्हा संकलीत करुन आज रोजी सोबत आणलेली असून, **सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती देण्याची तयारी दर्शविली परंतू अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांची विनंती अमान्य केली. यावरुन अपिलार्थी यांना माहिती प्राप्त**

करुन घेण्यात स्वारस्य दिसून येत नाही. आयोगाच्या असेही निदर्शनास आलेले आहे की, अपिलार्थी हे वारंवार संबंधित प्राधिकरणाकडे अपिल अर्ज दखल करीत असतात. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे आठ द्वितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे आठ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-6898 दिनांक : 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०७३२/२०२४**
**बोर्ड क्र.३९**

श्री. गजानन चंद्रकांत कुलकर्णी, — अपिलार्थी
रा. ब्राम्हणगल्ली, नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, नळदुर्ग,
ता. तुळजापूर, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद नळदुर्ग,
ता. तुळजापूर, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०५.२०२३ | दि.०१ मार्च २०२० ते ३१ मार्च २०२३ या कालावधीतील नळदुर्ग शहरातील प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुल मंजूरी लाभार्थी यादी व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने ४२०१०/- इतक्या शुल्काचा भरणा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत कळविण्यात आले होते तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. तसेच दि.२१.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सविस्तरपणे म्हणजे, देय होणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच काही माहिती संकेत स्थळावर उपलब्ध असल्याने संकेतस्थळ कळविण्यात आलेले आहे. तसेच कार्यालयात उपलब्ध असलेली देय होणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२१.०८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, ०८ दिवसात अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती सत्यप्रतीत देत नसलेबाबत व अपुर्ण माहिती दिलीबाबत, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण माहिती दिल्याचे दिसून येत आहे. **प्रथम अपिलीय अधिकारी दि.२१.०८.२०२३ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 6899 दिनांक : 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०२१९/२०२४,**
**४९९८ व ४९९९/२०२४**
**बोर्ड क्र.४१ ते ४३**

श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, — अपिलार्थी
रा. गांधी मार्केट स्टेशन रोड, परळी वैजनाथ,
ता. परळी वैजनाथ, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, तुळजापूर, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद तुळजापूर, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०१.२०२४ व दि.१५.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.१०.१०२३ | दि.०१ जानेवारी १९९५ ते आजतागायत या कालावधीतील नगर परिषद तुळजापूर अतिक्रमण विभागातील अतिक्रमण केलेल्या कारवाईतील आवक जावक व वसूल केलेल्या रक्कमेच्या किर्दनोंदीची संपूर्ण संचिकेसह डिटेल देण्यात यावी. |
| ०३.०१.२०२४ | दि.१४ जुलै २०२३ ते आजतागायत या कालावधीती नगर परिषद तुळजापूर शहरात व शहराच्या आजु बाजूच्या नगर परिषद हद्देनुसार शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या व भारत सरकाच्या घेतलेल्या सांस्कृतिक कार्यक्रम व जनसंपर्क सांस्कृतिक कार्यक्रमाचा गेल्या पाच ५ वर्षापासूनचा व संपूर्ण तपशिलासह जिआर देण्यात अहवाल देण्यात यावा व इतर.. |

| | |
|---|---|
| १०.१०.२०२३ | दि.०१ जानेवारी १९९५ ते आजतागायत या कालावधीतील नगर परिषद तुळजापूर अतिक्रमण विभागातील अतिक्रमण केलेल्या कारवाईतील आवक जावक व वसूल केलेल्या रक्कमेच्या किर्दनोंदीची संपूर्ण संचिकेसह डिटेल देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अद्याप दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, तुळजापूर, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या तीन जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.
२. मुख्याधिकारी, नगर परिषद तुळजापूर, जि. धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे तीन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6915 दिनांक : 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५००४, ५००५ व ५००७/२०२४**
**बोर्ड क्र.४४ ते ४६**

श्री. अविनाश राजेंद्र पवार, — अपिलार्थी
रा. वासुदेव गल्ली तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
आस्थापना विभाग, नगर परिषद,
तुळजापूर, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, तुळजापूर, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी तीन माहिती अर्जान्वये जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.०१.२०२४ | सन २०२१ ते आजतागायत याकावधीतील नगर परिषद कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांची कलम ४(१) (ब) (एक) अनुसार माहिती देण्यात यावी. |
| २०.१२.२०२३ | सन १९९५ ते दि.०२.०१.२०१७ या कालावधीतील कै. भारत राजाराम देवकर यांच्या हजेरी रजिष्टरची / पटांची छायांकित प्रत देण्यात यावी. |
| २०.१२.२०२३ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना तुळजापूर शहर उपअध्यक्ष यांनी देण्यात आलेल्या निवेदन व स्मरणपत्र यांच्या वर करण्यात आलेली कार्यवाही याची दि.१३.१०२०२३ यांच्या निवेदनाच्या तक्रार व कारवाई करण्यात आलेल्या दस्तऐवज यांच्या छायांकित सत्यप्रती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जाणुन बुजून अर्धवट अपुर्ण माहिती देणे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. अपिलार्थी यांनी त्रोटक, त्रयस्थ पक्षाची व प्रश्नोत्तराची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय योग्य दिसून येत आहे. अपिलार्थी यांचा युक्तिवाद व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे तीन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

अपिलार्थी यांचे तीन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्र 2113 26/06/2025)

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6895 दिनांक : 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०७०४/२०२४**
**बोर्ड क्र.४७**

श्री. उत्तम शंकरराव अमृतराव, — अपिलार्थी
रा. खडकाळ गल्ली तुळजापूर, जि. धाराशिव
मो.नं.७०५८९७५५६९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, तुळजापूर, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, तुळजापूर, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.१०.२०२३ | दि.०१ जानेवारी २०२२ ते आजपर्यंत या कालावधीतील तुळजापूर शहरा अंतर्गत गटार, नाली कामाबाबत१. तुळजापूर शहरात चालू असलेले गटार,नाल्या शहरात कोणत्या योजने अंतर्गत आहेत २. वरील योजनाचे अंदाजपत्रकीय रक्कम खर्चाबाबत सविस्तर माहिती ३. वरील कामे कोणती यंत्रणा, एजंन्सी राबवत आहे त्याची सविस्तर यादी |

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मोघम व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. नेमकी माहिती मागितलेली नाही. अशी माहिती एकत्रित करण्यास

सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागिल भुमिका व उदिष्ठ सफल होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 7349 दिनांक :- 02/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८०३८/२०२४**
**बोर्ड क्र.४८**

श्री. मालोजी अंबऋषी नाईकवाडी, — अपिलार्थी
रा. शुक्रवार पेठ मंकावती गल्ली तुळजापूर,
ता. तुळजापूर, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, तुळजापूर, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद तुळजापूर, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०५.२०२४ | जानेवारी २०१४ ते आजपर्यंत १. खडकाळ गल्ली, धाराशिव रोड येथील मटण मार्केट बाबत आलेले तक्रारी अर्ज २.नगर परिषदने तक्रारीवर केलेली कारवाई सत्य प्रतीत देणे. |

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मोघम, विस्तृत व प्रश्नोत्तराची माहिती मागितलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) मध्ये माहितीची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येनुसार माहिती तयार करुन, माहितीचे संस्करण करुन, इतर कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेऊन, लेखी, खुलासे वजा, स्पष्टीकरण मागणारी इ. माहिती देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीचा अर्ज ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त होतो, त्यावेळी जी माहिती त्यांच्या कार्यालयात ज्या स्थितीत उपलब्ध असते, ती माहिती त्याच स्थितीत अपिलार्थीस देय होते. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती

अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती देय होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 7350 दिनांक :- 02/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८१३१ ते ८१३३/२०२४**
**बोर्ड क्र.४९ ते ५१**

श्री. पोपट नागनाथ माने, — अपिलार्थी
रा. ६०८/२/२१, समर्थ नगर, जिजामाता नगर, तुळजापूर,
ता. तुळजापूर, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, तुळजापूर, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद तुळजापूर, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०४.२०२४ | सी.टी.एस.नंबर ३५३८ मधील सहीस्तेदार सौ. अस्मिता अनिल कुलकर्णी यांच्या जागेचे पूर्ण बांधकाम केलेले असताना २५.०० चौ.मी.चीच का नोंद घेतली यांची छायांकित प्रत देण्यात यावी बांधकाम परवाना आहे का नाही यांची प्रत देण्यात यावी, अर्ज दि.२३.०९.२०२४ या रोजी दिलेल्या अर्जावर आपण काय कार्यवाही केलेली आहे याची छायांकित प्रत मला देण्यात यावी. |
| ०५.०४.२०२४ | आपणास दि.२३.०१.२०२४ रोजी फुटपाथ विषयी अर्ज दिला आहे, पुर्व बाजूस फुटपाथ का केला नाही. याची छायांकित प्रतीसह कारण मीमासा मला देण्यात याव्यात, अतिक्रमण असेल तर त्वरीत काढू फुटपाथ करुन देण्यात यावे. |
| ०५.०४.२०२४ | दि.२७.१२.२०२३ या दिनांकास आपणास अर्ज दिला होता, संदर्भीय अर्जानुसार |

| | |
|---|---|
| | आजच्या तारखेपर्यंत आपण मागील अर्ज व वरील अर्जावर काय कार्यवाही केली त्याबाबत छायांकित प्रत मला दयावी. सर्व्हे नंबर २१७ मधील सलीमाबी शेख यांची प्लॉटींग आहे. त्यापैकी प्लॉट नंबर २ व ९४ ओपन स्पेस (मोकळीजागा) आहेत. ती जागा आजच्या तारखेपर्यंत १ रु. स्टॅम्प हस्तांतरीत केल्याले असेल तर मला त्याची छायांकित प्रत देण्यात यावी. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारी माहिती दिली आहे व आजपर्यंत माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मोघम, विस्तृत व प्रश्नोत्तराची माहिती मागितलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) मध्ये माहितीची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येनुसार माहिती तयार करुन, माहितीचे संस्करण करुन, इतर कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेऊन, लेखी, खुलासे वजा, स्पष्टीकरण मागणारी इ. माहिती देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीचा अर्ज ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त होतो, त्यावेळी जी माहिती त्यांच्या कार्यालयात ज्या स्थितीत उपलब्ध असते, ती माहिती त्याच स्थितीत अपिलार्थीस देय होते. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती देय होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अतः आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे तीन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7351 दिनांक : 02/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २५२२/२०२४**
**बोर्ड क्र.४०**

श्री. सादीक अली फारुक शेख, — अपिलार्थी
रा. २८३/२, रमजान पॉईट क विभाग, नविन विडी घरकुल,
कुंभारी, सोलापूर-४१३००६
मो. नं.९८३४१५८८२७

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नगर अभियंता, नगर परिषद कार्यालय नळदुर्ग,
ता. तुळजापूर, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, नळदुर्ग,
ता. तुळजापूर, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.०२.२०२३ | सन २०१७ ते २०२३ या कालावधीतील १. नळदुर्ग शहराच्या विकास कामासाठी आपल्या कार्यालयामार्फत काढण्यात आलेल्या निविदा याची सविस्तर तपशीलवार माहितीचे सत्यप्रत, अवलोकन होऊन हवी असलेली माहिती मिळणेबाबत. २. आपल्या कार्यालयातील वरील कालावधीत झालेल्या गुंठेवारी नोदची सविस्तर तपशीलवार माहितीचे सत्यप्रत अवलोकन होऊन हवी असलेली माहिती मिळणे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१६.०५.२०२४ रोजी रु.१५४ इतक्या शुल्काचा भरणा करुन माहिती हस्तगत करुन घ्यावे असे कळविलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०५.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, ०८ दिवसात अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, हवी असलेली माहिती वारंवार नाकारलेली आहे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे दिसून येत नाही. **प्रथम अपिलीय अधिकारी दि.०५.०३.२०२४ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगर परिषद कार्यालय नळदुर्ग,ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 6914 दिनांक :- 26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८१३४/२०२४**
**बोर्ड क्र.५२**

सौ. मनिषा पोपट माने, — अपिलार्थी
रा. ६०८/२/२१, समर्थ नगर, जिजामाता नगर, तुळजापूर,
ता. तुळजापूर, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, तुळजापूर, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद तुळजापूर, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०४.२०२४ | मी आपल्या कार्यालयाकडे दि.२८.११.२०२३ या तारखेस तक्रारी अर्ज केला होता. तुम्हाला कागदपत्राची पुरतता केलेली असताना सुध्दा आपण आजपर्यंत कसलीच कार्यवाही केलेली नाही तरी आपण त्या अर्जावर कार्यवाही करावी व केली नसेल तर का केली गेली नाही याची सर्वाची छायांकित प्रत मला मिळावी ही विनंती, त्या जागेमध्ये महामुनी यांनी भाडेकरु ठेऊन आम्हास त्रास देण्यास सुरवात केलेली आहे. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मोघम, विस्तृत व प्रश्नोत्तराची माहिती मागितलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) मध्ये माहितीची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येनुसार माहिती तयार करुन, माहितीचे संस्करण करुन, इतर कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेऊन, लेखी, खुलासे वजा, स्पष्टीकरण मागणारी इ. माहिती देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीचा अर्ज ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त होतो, त्यावेळी जी माहिती त्यांच्या कार्यालयात ज्या स्थितीत उपलब्ध असते, ती माहिती त्याच स्थितीत अपिलार्थीस देय होते. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती देय होत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकेर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7352 दिनांक : 02/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०७०६/२०२४**
**बोर्ड क्र.५३**

श्री. ज्ञानदेव लिंबराज गंभीरे, अपिलार्थी
रा. ईटकूर, ता. कळंब, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
मुख्यालेखापाल,
विभागीय वन अधिकारी कार्यालय,
मध्यवर्ती प्रशासकीय ईमारत गाळा क्र.३९, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा ),
धाराशिव मुख्यालय लातूर

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.०८.२०२३ | दि.२७.०६.२०२३ व दि.१८.०७.२०२३ च्या अर्जावर काय कार्यवाही झालेली आहे त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, माहिती देण्याचे आदेशीत करुन ही जन माहिती अधिकारी यांनी मला अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांना दि.३०.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती

उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१७.१०.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे जन माहिती अधिकारी यांनी अवमान केलेले आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.३०.०८.२०२३ रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे. तसेच आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती अपिलार्थी यांना देण्यात आली असून दिलेल्या माहितीशिवाय दुसरी माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याबाबत अवगत केलेले आहे. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांच्या प्रयोजनामध्ये व युक्तिवादात आयोगास तथ्यांश दिसून येत नाही. प्रसंगावशात, अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीबाबत काही तक्रार असल्यास या संदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

अतः आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7353 दिनांक :- 02/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४७५६/२०२४**
**बोर्ड क्र.५४**

श्री. राजाराम दामु काळेबण, — अपिलार्थी
मु. पो. अचकदाणी, ता. सांगोला, जि. सोलापूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वन परिक्षेत्र अधिकारी, लातूर विभागीय कार्यालय, लातूर
अहमदपूर, तुळजापूर,मु. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा), धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०३.२०२४ | सन ०२ जन २०२३ ते आजतागायत या कालावधीतील विभागीय अधिकारी, प्रादेशिक धाराशिव अंतर्गत येणाऱ्या रेंज लातूर पेठ, लातूर वि का, अहमदपूर, उमरगा, भूम, धाराशिव तुळजापूर या रेंजमार्फत झालेल्या कामाची व्हाऊचर, (प्रामाणिके) व कॅशबुकची माहिती साक्षांकित करुन मिळावी |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहिती पैकी उमरगा आणि भूमची माहिती मिळालेली आहे. उर्वरीत माहिती मिळालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल विभागीय वन अधिकारी कार्यालय, धाराशिव

यांनी दि.१२.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कलम ६(३) नुसार वन परिक्षेत्र अधिकारी, भूम, उमरगा, तुळजापूर मु. धाराशिव, लातूर, वि.का.लातूर, अहमदपूर यांना वर्ग करुन अपिलार्थी यांनी संबंधित प्राधिकरणाकडे माहितीसाठी संपर्क साधावा असे अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१८.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, अवलोकन दिले नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१८.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांना वनपरिक्षेत्रे अधिकारी, तुळजापूर मु. धाराशिव, भुम यांनी अवलोकनासाठी उपस्थित राहण्यासाठी कळविण्यात येवून ही अपिलकर्ते यांना अनुपस्थित राहीले, या स्तरावरुन निकाली काढले असा निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.** या सर्व बाबी विचारात घेता, प्रत्येक कार्यालयात जन माहिती अधिकारी हे निश्चित करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी प्रत्येक कार्यालयाकडे स्वतंत्र माहितीचा अर्ज करुन माहिती मागणे अपेक्षित आहे, या ठिकाणी तसे केल्याचे दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---१३७०--- दिनांक :---02/07/2025---

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७७९१/२०२४**
**बोर्ड क्र.५५**

श्री. राजाराम दामु काळेबाग, — अपिलार्थी
मु. पो. अचुकदाणी, ता. सांगोला, जि. सोलापूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
लेखापाल, सामाजिक वनीकरण विभाग,
मध्यवर्ती शासकीय इमारत धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग,
मध्यवर्ती शासकीय इमारत धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, द्वितीय अपिल दाखल केल्यानंतर मला माहिती मिळालेली आहे. माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली जन माहिती अधिकारी यांच्याकडुन माहिती प्राप्त झाली असुन प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झालेले आहे. त्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 7354 दिनांक : 02/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८८९०/२०२४**
**बोर्ड क्र.५६**

श्री. प्रशांत अच्युतराव लोमटे — अपिलार्थी
रा. बाबा नगर कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
परिक्षेत्र भूम, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
परिक्षेत्र भूम, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.०५.२०२४ | सन २०२०-२०२३ या कालावधीमध्ये नरसरीला आलेले बजेटव झालेला खर्च व माहिती २. गायराण व नर्सरी मधील मजूराचे नावे व त्यांचे नावावरील चेक व रक्कम एक प्रत सहीत माहिती मिळावी ३. मजूरांना शासकीय हजेरी किती व दिले हजेरी किती मस्टर एक प्रत सही माहिती ४. नर्सरी नाईटवॉचमन कोण व त्यांचे नावे व त्यांच्या नाव काढलेले चेक व त्यांची माहिती ५. नर्सरी वरील गायराणमध्ये मजूराचे नावे व त्यांची काढलेली रक्कम व माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२३.०७.२०२४ व दि.२२३.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयात

उपस्थित राहून माहितीची पाहणी करावी म्हणजे आपणास हवी असलेली माहिती देता येईल असे कळविले होते. तथापि अपिलार्थी यांनी दोन्ही वेळेस कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी प्रथम अपिल कळंबच्या कार्यालयाकडे दाखल करण्या ऐवजी भूमच्या कार्यालयाकडे प्रथम अपील दाखल केलेले असल्यामुळे प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आलेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), परिक्षेत्र भूम, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), परिक्षेत्र भूम, जि. धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.----7355---------- दिनांक :- 02/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०९२१/२०२४**
**बोर्ड क्र.५७**

ॲड. पृथ्वीराज सुधाकर गवळी, — अपिलार्थी
रा. पुजारी हॉटेलच्या बाजूला,
रणखांब इमारत, समता नगर, धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वन परिक्षेत्र अधिकारी,
परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, भूम, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा),
वनसंरक्षक कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक-१८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.०९.२०२४ | एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीतील शासकीय योजनेसाठी आलेला निधी व योजनेसाठी वितरीत करण्यात आलेल्या निधीचा तपशिल |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना दि.१८.१२.२०२४ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी महिती स्वीकारुन माहिती मिळाली माझी काहीही तक्रार नाही तसेच भविष्यातही कोणत्याही प्रकारची तक्रार राहणार नाही असे लेखी निवेदन दिलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलाथी यांच्या प्रथम अपिलावर दि२६.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती मिळाली तक्रार नाही असे लेखी नमूद करुन दि.१८.१२.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी भूम (प्रा.) यांना दिलेल्या पत्रावरुन अपिलार्थी यांना माहिती मिळाली असल्याचे दिसून येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचे लेखी पत्र व जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7356 दिनांक: 02/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०९२६/२०२४**
**बोर्ड क्र.५८**

श्री. रविकांत रामराव राठोड, — अपिलार्थी
रा. धानुरी, ता. लोहारा, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वन परिक्षेत्र अधिकारी,
परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, तुळजापूर, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा),
वनसंरक्षक कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.०१.२०२४ | माहे फेब्रुवारी २०२३ ते माहे मार्च २०२३ कालावधीतील योजनेची रोकड वही, कॅशबुकच्या सत्यप्रती प्रमाणित करुन माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२२.०३.२०२४ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मागणी केलेली माहिती मुदतीच्या आत दिलेली नाहीत, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२२.०३.२०२४ रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आयोगास योग्य दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7357 दिनांक : 02/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०९३३/२०२४**
**बोर्ड क्र.५९**

श्री. रविकांत रामराव राठोड, अपिलार्थी
रा. धानुरी, ता. लोहारा, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
वन परिक्षेत्र अधिकारी,
परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, उमरगा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा),
वनसंरक्षक कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.०१.२०२४ | माहे फेब्रुवारी २०२३ ते माहे मार्च २०२३ या कालावधीतील योजनेची रोकड वही, कॅशबुकच्या सत्यप्रत प्रमाणित करुन माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२३.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, अवलोकनासाठी दि.२९.०२.२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत हजर रहावे. आपणास आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मुदतीच्या आत दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२३.०२.२०२४ रोजी कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7358 दिनांक : 02/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०४२७/२०२४**
**बोर्ड क्र.६०**

श्री. रामेश्वर पंढरीनाथ भराडीया, — अपिलार्थी
रा. हनुमान मंदीर शेजारी, हनुमान चौक, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक अधिक्षक अभियंता,
धाराशिव पाटबंधारे मंडळ, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
अधिक्षक अभियंता,
धाराशिव पाटबंधारे मंडळ, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.०९.२०२३ | दि.२०.०७.२०२३ ते दि.१५.०९.२०२३ या कालावधीतील GEM/2023/B/3727301 निविदा प्रकिया संदर्भात एकूण सात मुद्याद्वारे माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक अभियंता,धाराशिव पाटबंधारे मंडळ, धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. अधिक्षक अभियंता, धाराशिव पाटबंधारे मंडळ, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, पुणे यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7359 दिनांक : 02/07/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, पुणे

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५०१७/२०२४ व ५०१९/२०२४**
**बोर्ड क्र.६१ व ६३**

श्री. शरद स. कुलकर्णी, — अपिलार्थी
रा. रो-हाऊस क्र.०३, प्लॉट नं.९६/९७/९८ देशमुख नगर,
गणपती मंदिराच्या मागे, शिवाजीनगर जवळ, गारखेडा परिसर,
छत्रपती संभाजीनगर-४३१००९

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सह जिल्हा जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण विभाग, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा जलसंधारण अधिकारी,
मृद् व जलसंधारण विभाग, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५..०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०१.२०२४ | दि.०१.०१.२०१० ते माहिती देईपर्यंत या कालावधीतील १. प्रशासकीय मान्यता २. निवीदा सूचना ३. प्राप्त निविदा/ रेटलिस्ट/कोटेशन ४. कंम्पेरेटीव्ह स्टेटमेंट ५. मंजूर अंदाजपत्रक/ शेडयूल बी तांत्रीक मान्येतेसह ६. कार्यारंभ आदेश ७. कोर लॉगींग ८. वॉटर इंटके टेस्ट ९. संबंधीत एजन्सीचा प्रकल्पनिहाय सादर सर्वे रिपोर्ट १०. कामनिहाय कोर बॉक्सेस ताब्यात असल्याचे उपविभागीय जलसंधारण अधिकाऱ्याची प्रमाणपत्र. |
| १८.०१.२०२४ | दि.०१.०१.२०१० ते माहिती देईपर्यंत या कालावधीतील १. प्रशासकीय मान्यता २. निवीदा सूचना ३. प्राप्त निविदा/ रेटलिस्ट/कोटेशन ४. कंम्पेरेटीव्ह स्टेटमेंट ५. मंजूर |

| | |
|---|---|
| | अंदाजपत्रक/ शेडयूल बी तांत्रीक मान्यतेसह ६. कार्यारंभ आदेश ७. कोर लॉगींग ८. वॉटर इंटके टेस्ट ९. संबंधीत एजन्सीचा प्रकल्पनिहाय सादर सर्वे रिपोर्ट १०. कामनिहाय कोर बॉक्सेस ताब्यात असल्याचे उपविभागीय जलसंधारण अधिकाऱ्याची प्रमाणपत्र. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, द्वितीय अपिल दाखल केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी उशिराने दि.२८.०६.२०२४ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. दोन्ही प्रकरण निकाली काढण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली देय होणार माहिती त्यांना दि.२८.०६.२०२४ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान दोन्ही प्रकरणात माहिती उपलब्ध झाल्याचे मान्य केलेले आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7360 दिनांक :- 02/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५०१८/२०२४**
**बोर्ड क्र.६२**

श्री. शरद स. कुलकर्णी, अपिलार्थी
रा. रो-हाऊस क्र.०३, प्लॉट नं.९६/९७/९८ देशमुख नगर,
गणपती मंदिराच्या मागे, शिवाजीनगर जवळ, गारखेडा परिसर,
छत्रपती संभाजीनगर-४३१००९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता,
कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग-०१,
सिंचन भवन आनंदनगर, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा :उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग-०१,
सिंचन भवन आनंदनगर धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.११.२०२३ | दि.०१.०१.२०२० ते माहिती देईपर्यंत १. कार्यालयीन साहित्य, स्टेशनरी, पुरवठा करण्यासंदर्भात प्राप्त पत्राच्या प्रति २. कार्यालयीन कॉम्पुटर्स, प्रिंटर व इतर साहित्य पुरवठा करण्यासंदर्भात प्राप्त पत्राच्या प्रती ३. कार्यालयीन देखभाल दुरुस्ती व शासकीय निवासस्थान मधील किरकोळ देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी प्राप्त पत्राच्या प्रती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यांना दि.२९.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7371 दिनांक : 02/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५०२०/२०२४**
**बोर्ड क्र.६४**

श्री. शरद स. कुलकर्णी, — अपिलार्थी
रा. रो-हाऊस क्र.०३, प्लॉट नं.९६/९७/९८ देशमुख नगर,
गणपती मंदिराच्या मागे, शिवाजीनगर जवळ, गारखेडा परिसर,
छत्रपती संभाजीनगर-४३१००९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता,
कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग-०१,
सिंचन भवन आनंदनगर, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग-०१,
सिंचन भवन आनंदनगर धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.११.२०२३ | दि.०१.०१.२०१५ ते माहिती देईपर्यंत १. विभागात कार्य केलेल्या व कार्यरत का.अ. पदाचा तपशिल (Incumbency chart) २. विभागात कार्य केलेल्या व कार्यरत लेखापाल पदाचा तपशिल मिळणेबाबत. (Incumbency chart) |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती

अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी अशी आयोगास विनंती केली.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहितीच्या अनुषंगाने त्यांना दि.१२.१२.२०२३ रोजी रु.३४/- इतक्या शुल्काचा भरणा करुन माहिती हस्तगत करावी असे कळविलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग-०१,सिंचन भवन आनंदनगर, धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग-०१, सिंचन भवन आनंदनगर धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7372 दिनांक : 02/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५०२१/२०२४**
**बोर्ड क्र.६५**

श्री. शरद स. कुलकर्णी, — अपिलार्थी
रा. रो-हाऊस क्र.०३, प्लॉट नं.९६/९७/९८ देशमुख नगर,
गणपती मंदिराच्या मागे, शिवाजीनगर जवळ, गारखेडा परिसर,
छत्रपती संभाजीनगर-४३१००९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता,
कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग-०१,
सिंचन भवन आनंदनगर, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग-०१,
सिंचन भवन आनंदनगर धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.११.२०२३ | दि.०१.०१.२०२० ते माहिती देईपर्यंत १. कार्यालयीन साहित्य, स्टेशनरी, पुरवठा करण्यासंदर्भात प्राप्त पत्राच्या प्रती २. कार्यालयीन कॉम्प्युटर्स, प्रिंटर व इतर साहित्य पुरवठा करण्या संदर्भात प्राप्त पत्राच्या प्रती ३. कार्यालयीन देखभाल दुरुस्ती व शासकिय निवासस्थान मधील किरकोळ देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी प्राप्त पत्रांच्या प्रति. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही व्हावी अशी आयोगास विनंती केलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने विभागीय कार्यालयातील भांडारशाखेशी संबंधित असल्याने त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात सांगितले होते. तथापि संबंधीत शाखेकडून माहिती प्राप्त झालेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.३१.०१.२०२४ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तिवादात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग-०१,सिंचन भवन आनंदनगर, धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग-०१, सिंचन भवन आनंदनगर धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---7373--------------- दिनांक :---02/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५०२२/२०२४**
**बोर्ड क्र.६६**

श्री. शरद स. कुलकर्णी, अपिलार्थी
रा. रो-हाऊस क्र.०३, प्लॉट नं.९६/९७/९८ देशमुख नगर,
गणपती मंदिराच्या मागे, शिवाजीनगर जवळ, गारखेडा परिसर,
छत्रपती संभाजीनगर-४३१००९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता,
कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग-०१,
सिंचन भवन आनंदनगर, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग-०१,
सिंचन भवन आनंदनगर धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.११.२०२३ | दि.०१.०१.२०१५ ते माहिती देईपर्यंत विभागत कार्य केलेल्या व कार्यरत भांडारपाल पदाचा तपशिल (Incumbency chart) मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, शुल्काचा भरणा करुनही मला अद्याप माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही व्हावी अशी आयोगास विनंती केलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहितीच्या अनुषंगाने त्यांना दि.१२.१२.२०२३ रोजी रु.३४/- इतक्या शुल्काचा भरणा करुन माहिती हस्तगत करावी असे कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवाद व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग-०१, सिंचन भवन आनंदनगर, धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग-०१, सिंचन भवन आनंदनगर धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7374 दिनांक : 02/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८१८०/२०२४**
**बोर्ड क्र.६७**

श्री. बस्वराज लिंगप्पा जमादार, — अपिलार्थी
मु. पो. निलेगांव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण उपविभाग, तुळजापूर, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारा विभाग, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०२.२०२४ | सन २०२३ मं २०२४ मधील तालुक्यातील आपण कार्यालयामार्फत किंवा कामे मंजूर झाली आहेत याची यादी देण्यात यावी, मंजूर झालेल्या कामांची कार्यारंभ आदेशाच्या छायांकित प्रती |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, मी सध्या नविन आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१८.०६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये,

माहिती मुदतीत दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, तुळजापूर, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारा विभाग, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7375 दिनांक : 02/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७२२२/२०२४**
**बोर्ड क्र.६८**

श्री. विजय भानुदास मेहेर, — अपिलार्थी
रा. निजापूर गल्ली, परंडा,
ता. परंडा, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण विभाग, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण विभाग, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०४.२०२४ | मार्च २०२१ ते आजपर्यंत या कालावधीतील, १. मौजे परंडा तालुका येथे गाळ मुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजने अंतर्गत कामाच्या एम बी रेकॉर्डीग मिळणेबाबत २.प्रत्येक साईटची काम करण्यापूर्वीची नंतरची चित्रे फोटो आणि व्हिडिओ मिळणेबाबत.३. शेतकन्याचे घेण्यत आलेले पुराव्याची संचिका मिळणेबाबत. ४. वर्क ऑर्डर कोणत्या संस्थेला दिले संस्थेचे व एजन्सीचे नाव. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२१.१०.२०२४ रोजी १३० पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कुठलीही माहिती देण्यात आलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे व अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7376 दिनांक : 02/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७७३१/२०२४**
**बोर्ड क्र.६९**

श्री. विकास जगन बनसोडे, अपिलार्थी
रा. सूर्यपुत्र भैय्यासाहेब, आंबेडकर मार्ग, अजिंठा नगर,
धाराशिव-४१३ ५०१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
लेखाधिकारी,
महिला आर्थिक विकास महामंडळ, युनियन बँकेच्या वर
पहिला मजला, पोलीस ग्राऊंडसमोर, धाराशिव औरंगाबाद
रोड, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
जिल्हा समन्वय अधिकारी,
महिला आर्थिक विकास महामंडळ, युनियन बँकेच्या वर
पहिला मजला, पोलीस ग्राऊंडसमोर, धाराशिव औरंगाबाद
रोड, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२५.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०३.२०२४ | सन २०१६ ते २०१७ या आर्थिक वर्षात आपल्या महामंडळार्गत किती महिला लाभार्थींना शेळया वाटप करण्यात आल्या त्यांची नाव, गावांसह यादी देण्यात यावी, शेळया खरिदी करण्यात आलेल्या व्यक्तीचे नांव, गावसह यादी, वाटपासाठी काढण्यात आलेल्या निविदेची साक्षांकित प्रत व शेळयावाटप करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांची नावाची यादीसह साक्षांकित प्रती करुन द्यावीत. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येत की, अपिलार्थी यांनी विस्तृत, व्यापक व त्रयस्थांची वैयक्तिक माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये आयोगास कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नाही. तसेच मागणी केलेली माहिती प्रकट केल्यामुळे नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते, याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलात व दि.१८.०६.२०२५ रोजी लेखी निवेदन सादर केलेले आहे, यात अपिलार्थी यांनी कोणतेही समर्थनीय कारण नमूद केलेले नाही. सारांशाने अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील फेटाळण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 7377 दिनांक :- 02/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०७८/२०२४, १०७९/२०२४ व १०८२५/२०२४**
**बोर्ड क्र.७०, ७१ व ७४**

श्री. उमेश भास्कार सोनवणे, — अपिलार्थी
रा. डी.एड. कॉलेज शेजारी देवगांव रोड, परंडा,
ता. परंडा, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
शाखा अभियंता,
मृद व जलसंधारण विभाग मध्यवर्ती प्रशासकीय इमारत तिसरा मजला धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण विभाग मध्यवर्ती प्रशासकीय इमारत तिसरा मजला धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.१०.२०२४ व दि.१६.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे तीन माहिती अर्जाद्वारे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०४.२०२४ | डी पी डी सी अंतर्गत सन २०२३-२४ वर्षात जिल्हयातील नदी खोलीकरण सरळीकरण कामाची, रुंदीकरण. एम.बी. खर्च, अंदाजपत्रकाची, पावत्या इ. कामाची माहिती मागितलेली आहे. |
| १०.०४.२०२४ | सन २०२३-२४ या कालावधीतील परंडा तालुक्यातील गाळ उपसा करण्यात येत असलेल्या धरणाचे नावे व ठिकाण गाव निहाय शेतकऱ्याच्या नावाची यादी |

| | |
|---|---|
| | अंदाजपत्रक, वर्कऑर्डर झेरॉक्स प्रत, गाळ उपसा सुरु केल्याची तारीख ठेकेदार संस्थाचे नावे दैनंदिनी डाटा एन्ट्रीची माहिती देण्यात यावी. |
| २७.०९.२०२४ | सन २०२४ व या कालावधीतील गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार, या योजने अंतर्गत परंडा तालुक्यातील सिराळा येथील कामाची माहिती, १. लाभार्थी शेतकऱ्यांचे नाव, किती गाळ उपसा केला, २. ठेकदार, सोसायटीचे नाव, गाळ उपसा केलेल्या तलावाचे नाव, ३. एकूण किती गाळ उपसा केला व त्याची एकूण रक्कम किती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती तीन्ही अर्जाच्या अनुषंगाने दि.०३.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शुल्काचा भरणा करुन माहिती हस्तगत करावी असे कळविले होते. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थी यंना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या तीन्ही प्रथम अपिलावर दि.१८.०६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशीत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, शुल्काचा भरणा करुनही माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.०६.२०२४ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** त्यामुळे अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन्ही द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या तीन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. जिल्हा जलसंधारण अधिकारी,मृद व जलसंधारण विभाग, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे तीन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7369 दिनांक : 02/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०४३१/२०२४ व १०४३२/२०२४**
**बोर्ड क्र.७२ व ७३**

श्री. सुरज महादेव माळी, — अपिलार्थी
मु.पो. आळणी, ता.जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता,
कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.०१, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.०१, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२५.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०९.२०२४ | दि.०१.१२.२०१९ ते ३१.०९.२४ या कालावधीतील शासकीय वाहनाचे लॉकबुक व ड्रायव्हरचे नाव लायसन्स, वाहनाचे फास्टटँगचे अदा केलेले बिल व वाहन दुरुस्ती वर झालेला खर्चाचे बिल इ. |
| ०४.०९.२०२४ | सन २०२० ते दि.३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीतील एकूण खाजगी घेतलेल्या वाहनाचे लॉकबुक वाहन चालकाचे नाव ड्राव्हींग लायसन्स आर सी बुक व परवाना धारकाना अदा केलेले बिल एकूण झालेल्या निविदा आलेल्या निविदा, वरील माहिती कृष्णा मराठवाडा बांधकाम व उपसा सिंचन विभाग या दोन्ही कार्यायाची मिळावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दि.०९.०४.२०२५ रोजीच्या निवेदनावरुन दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या निवेदनात असे नमूद केले आहे की, अपील अर्ज स्वखुशीने मागे घेत असल्याचे लेखी कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवारा व अपिलार्थी यांचे दि.०९.०४.२०२५ रोजीचे लेखी निवेदन विचारात घेता, अपिलार्थी यांचे दोन्ही व्दितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 7366 दिनांक :- 02/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७९२०/२०२४**
**बोर्ड क्र.७५**

श्री. गुणेंद्र कुंडलिक आकाडे, — अपिलार्थी
रा. औद्योगिक प्रशिक्षण संस्था इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
शासकीय म.रा. तांत्रिक प्रशाला (टेक्नीकल हायस्कूल), धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी, — : उत्तरवादी क्र.२
शासकीय म.रा. तांत्रिक प्रशाला (टेक्नीकल हायस्कूल), धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०५.२०२२ | जाने-२०१६ ते एप्रिल २०२२ या कालावधीतील श्री. पी. व्ही. ज्ञानपुरे मुख्याध्यापक, (सेवानिवृत्त) यांच्या माहितीबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये, त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहित मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये आयोगास कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नाही. तसेच मागणी केलेली माहिती प्रकट

केल्यामुळे नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते, याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलात कोणतेही समर्थनीय कारण नमूद केलेले नाही. सारांशाने अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील फेटाळण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6 7367 दिनांक : 02/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७९२२/२०२४**
**बोर्ड क्र.७६**

श्री. भिडे किशोर ठकसेन, — अपिलार्थी
रा. स.नं.४७/०१/१२, प्लॉट नंबर ०९, तिसरा मजला साईदिप अपार्टमेंट धनलक्ष्मी सोसायटी, सुनिला नगर, वडगावशेरी, पुणे-४१० ०१४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.०१, सिंचन भवन आनंद नगर धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.०१, सिंचन भवन आनंद नगर धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०१.२०२२ | सन २०२१ ते २०२२ या कालावधीतील आपल्या मंडळ कार्यालयाअंतर्गत काढण्यात आलेल्या निविदा सुचना क्रमांक.०४ सन २०२२ या निविदा सूचना (टेंडर नोटीस) संबंधी एकूण चार मुद्याची माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.३१.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये पोस्टाने पाठविलेली होती. तथापि अपिलार्थी यांचा अपूर्ण पत्ता असल्यामुळे परत आलेली आहे. नंतर अपिलार्थी यांना माहिती पाठविण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याने व प्रथम अपिलावर सुनावणी न घेतल्याने, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी दि.३१.०१.२०२२ रोजी अपिलार्थी यांना माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनामध्ये तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7368 दिनांक :- 02/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०५८३/२०२४ व १०५८४/२०२४**
**बोर्ड क्र.७७ व ७८**

श्री. प्रकाश बाबुराव खंडाळे, — अपिलार्थी
रा. सायली निवास, भीमनगर कळंब,
ता. कळंब, जि. धाराशिव

विरुध्द

१ बँक मॅनेजर (शाखा व्यवस्थापक), : उत्तरवादी क्र.१
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर मल्टीस्टेट को-ऑप क्रे. सोसायटी जि. मोहा, शाखा कळंब, ता.कळंब, जि. धाराशिव

२ बँक मॅनेजर (शाखा व्यवस्थापक), : उत्तरवादी क्र.२
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर मल्टीस्टेट को-ऑप क्रे. सोसायटी जि. मोहा, शाखा कळंब, ता.कळंब, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व शाखा अधिकारी, लिसण महर्षी ज्ञानदेव मोटेकर मल्टीस्टेट को-ऑ.क्रे.सो.लि. मोहा, श्री. राहुल फुलचंद मडके उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०६.२०२४ | सन २०१९ पासून ते आजतागायत पर्यतची शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर, मल्टीस्टेट को.ऑप क्रे. सोसायटी लि. मोहा, शाखा कळंब, ता.कळंबख जि. धाराशिव या बँकेच्या कार्यक्षेत्रातील व अधिकार क्षेत्रातील माझ्या कर्जाच्या पुर्ण फाईलची मूळ (ओरीजनल) ओ.सी.ची छायांकित साक्षांकित संपूर्ण कागदपत्रासहीत कर्जाची फाईल मिळणेबाबत. |
| २४.०६.२०२४ | सन २०१९ पासून ते आजतागायत पर्यंतची शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर, मल्टीस्टेट को. ऑ.क्रे. सोसायटी लि. मोहा, शाखा कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव या बँकेचा |

| | |
|---|---|
| | खातेदार असून मी, कर्जदार असून कर्ज भरण्यासाठी या बँकेच्या अंतर्गत कार्यक्षेत्राअंतर्गत व अधिकार क्षेत्राअंतर्गत, बँकींग प्रणालीशी संबंधीत कर्ज वाटप प्रणालीशी नऊ मुद्याची माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान शाखा व्यवस्थापक, श्री. राहूल मडके यांनी अवगत केले की, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर मल्टीस्टेट को-ऑप. के.सो.लि.मोहा, ही संस्था अॅक्ट २००२ नुसार सहकारी अधिनियमाअंतर्गत नोंदणीकृत झालेली असून ती एक स्वायत्त संस्था आहे. केंद्रीय सहकारी निबंधक यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असून संस्थेची स्थापना पुर्णत्व सभासदाच्या सहभागातून झाली आहे. संस्थेस कोणतेही सरकारी अर्थसहाय्य थेट अथवा प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष स्वरुपात प्राप्त होत नाही. संस्थेचे व्यवस्थापन आर्थिक निर्णय कर्मचारी भरती इ. सर्व अधिकार संस्थेच्या संचालक मंडळाकडे आहेत. RTI कायदयानुसार आम्ही सरकाच्या नियंत्रणाखाली नाहीत. तसेच सरकारकडून कुठल्याही प्रकारचे आर्थिक सहाय्य घेत नसल्याने व मिळत नसल्याने RTIकायदयानुसार Public Authority म्हणून सरकारने मल्टीस्टेट को- ऑपरेटीव्ह केडीट सोसायटी RTI च्या कार्यक्षेत्राबाहेर ठेवले आहे.

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर मल्टीस्टेट को ऑ-सो.लि.मोहा. ही संस्था केंद्रीय निबंधक, सहकार विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडे नोंदणी झाली आहे. या संस्थेवर महाराष्ट्र शासनाचे कसल्याही प्रकारचे कायदेशीर नियंत्रण नाही. संस्थेच्या कारभारामध्ये केंद्रीय निबंधक हेच प्रमुख आहेत. त्यामुळे महाराष्ट्र शासनाचा माहितीचा अधिकार कायदा २००५ व त्याखालील नियम या संस्थेला कसल्याही प्रकारे लागु होत नाहीत. त्यामुळे अर्जदार श्री. प्रकाश बाबुराव खंडाळे यांना या कायदयाचा वापर करुन माहिती मागवुन त्यावर मान्यवर माहिती आयोगाकडे अपील दाखल करण्याचा अधिकार नाही. अपिलार्थी हे सोसायटी कडून कर्ज घेतलेले आहे. त्या कर्जाची नियमानुसार परत फेड करण्या ऐवजी ते अर्ज फाटे करुन सोसायटीस वेठीस ठरत आहे. त्यामुळे सदरची अपील खर्चासह फेटाळणे आवश्यक आहे अशी आयोगास विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न देणे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात शाखाधिकारी यांनी केलेला युक्तिवाद विचारात घेता, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7346 दिनांक : 02/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ११०११/२०२४ व ११०१२/२०२४**
**बोर्ड क्र.७९ व ८०**

श्री. आकाश प्रकाश खंडाळे, — अपिलार्थी
प्रो. आकाश मोटर्स, कळंब, सायली निवास, भिमनगर कळंब,
ता. कळंब, जि. धाराशिव-४१३ ५०७

**विरुध्द**

१ बँक मॅनेजर (शाखा व्यवस्थापक), : उत्तरवादी क्र.१
अंबेजोगाई पिपल्स को.ऑप बँक लि, अंबाजोगाई, शाखा कळंब ढोकी रोड, कळंब. ता.कळंब, जि. धाराशिव

२ मुख्यव्यवस्थापक, संचालक, मुख्य कार्यालय, अंबाजोगाई : उत्तरवादी क्र.२
पिपल्स को.ऑप बँक लि, अंबाजोगाई सहकार भवान, प्रशांतनगर, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२६.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०८.२०२४ | सन २०१८ पासून ते आजतागायत पर्यंतची, अंबाजोगाई पिपल्स को. ऑप बँक लि. अंबाजोगाई, शाखा कळंब, ढोकी रोड, कळंब, ता. कळंब, जि.धाराशिव या बँकेचा मी खातेदार असून मी कर्जदार असून, बँकेचे वैद्य कर्ज भरण्यासाठी या बँकेच्या अंतर्गत, कार्यक्षेत्रा अंतर्गत व अधिकार क्षेत्राअंतर्गत, बँकींग प्रणालीशी संबंधीत कर्ज वाटप प्रणालीशी एकूण ०९ मुद्याची माहिती मागितलेली आहे. |
| २३.०८.२०२४ | सन २०१८ पासून ते आजतागायत पर्यंतची अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक लि., अंबाजोगाई, शाखा कळंब, ढोकी रोड, कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव या बँकेच्या कार्यक्षेत्रातील अधिकार क्षेत्रातील माझ्या कर्ज प्रकरणाच्या पुर्ण फाईलची मूळ (ओरीजनल) ओ.सी.ची छायांकित साक्षांकित संपूर्ण कागदपत्रासहीत कर्जाची फाईल मिळणेबाबत एकूण १६ मुद्याची माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न देणे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व आयोगापुढील उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, व्यवस्थापकाने अपिलार्थीस दि.३०.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, आपण मागणी केलेल्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (१) अपील हा नागरी सहकारी बँकेस लागू होत नाही, त्यामुळे आपण मागणी केलेली माहिती आपणास देता येणार नाही असे कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात जरी नोंदणीकृ त सहकारी संस्थांना माहिती अधिकार कायदा लागू होत नसला तरी अशा सर्व सहकारी संस्थांनी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा (MCS Act) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ यातील नियम ६५ अन्वये प्रत्येक वर्षी संस्थेच्या संदर्भातील माहिती संबंधित निबंधक कार्यालयात दाखल करणे हे बंधनकारक आहे. तसेच नियम ७९(२) यात निबंधक कार्यालय यांना कलम ७९(१) आणि १ (A) यात दाखल करावयाची माहिती सादर न केल्यास सक्त निर्देश देण्याचे अधिकार सुध्दा नमूद केले आहेत. नियम ६५ अन्वये प्रत्येक सहकारी संस्थेने लेखापुस्तक व सहकारी कायद्या अंतर्गत बंधनकारक असलेली सहकारी संस्थेने केलेले वार्षिक गतीविधी संबंधित माहिती देणे आवश्यक आहे. वरील माहिती ही निबंधकारक प्रविर्ष्टी दाखल करणे सहकारी संस्थांना कायद्याने बंधनकारक असल्याचे मा. उच्च न्यायालय कार्यक्षेत्रात नोंदणीकृत सहकारी संस्थांनी दाखल केलेल्या अशी माहितीतून अर्जदार यांनी दाखल

केलेल्या जोडपत्र अ च्या अनुषंगाने माहिती उपलब्ध असल्यास माहिती प्रदान करावी व ही जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आलेली आहे. तसेच कलम १९(क) नुसार संस्थांनी निबंधक कार्यालयास सादर करावयाची माहिती दाखल केली नसल्यास अशी माहिती संबंधीत संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन ती अर्जदार यांना पुरविणे देखील नियमाने बंधनकार आहे. मात्र यातील त्रयस्थपक्षाशी संबंधित अथवा कोणाच्या खाजगीपणाचे हक्कावर गदा आणणारी माहिती देणे कलम ८(१) नुसार बंधनकारक नाही. अशी माहिती देण्यास संबंधित निबंधक कार्यालय नकार देऊ शकतात.

प्रस्तुत प्रकरणात संबंधित अंबाजोगाई पिपल्स को.ऑप बँक लि. अंबाजोगाई, जि. बीड यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड या कार्यालयात सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागितलेली माहिती ही सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अंबाजोगाई, जि. बीड यांच्या अभिलेखात असल्यास अशी माहिती सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अंबाजोगाई, जि बीड यांनी कलम ७ (६) नुसार अपिलार्थीस ३० दिवसात विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अतः आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अंबाजोगाई, जि. बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाद्वारे आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 7452 दिनांक : 07/07/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
१. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड
२. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अंबाजोगाई, जि. बीड

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७१०९/२०२३**
**बोर्ड क्र.८३**

श्री. प्रभाकर मनोहर महाले, — अपिलार्थी
रा. शिवनातीर, कन्नड,
ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
ग्रामीण रुग्णालय, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
अधिक्षक,
ग्रामीण रुग्णालय, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.०७.२०२३ | दि.०१ जानेवारी २०२१ ते दि.३० जुलै २०२३ पर्यंत या कालावधीतील कन्नड ग्रामीण रुग्णालयाच्या रुग्णाकडून फीसपोटी मिळालेल्या रक्कमेचा भरणा पावत्याच्या छायांकित व साक्षांकित प्रत व या रक्कमेतून खर्च केलेला असल्यास त्याचा तारीख निहाय तपशिल. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी व्यापक व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागिल भुमिका व उदिष्ठ सफल होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 7361 दिनांक :- 02/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५०१७/२०२३**
**बोर्ड क्र.८४**

श्री. अरुण दगडू माडूकर, — अपिलार्थी
रा. फ्लॅट नं.ए-३, अमृतवैभव अपार्टमेंट, जालननगर,
रेल्वेस्टेशन जवळ, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कार्यालय अधिक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बाबा पेट्रोल पंपाजवळ, महाविरचौक, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बाबा पेट्रोल पंपाजवळ, महाविरचौक, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.०८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०५.२०२३ | औरंगाबाद जिल्हा टेबल टेनिस असोशिएशन नोंदणी क्र. एफ-३७६ ची नोंदणी आपल्या कार्यालयात झालेली आहे. सदरल संस्थेच्या नोंदणी विषयक (मूळ संचिकेसह आजपर्यंत झालेल्या बदलासह) कगादपत्रांच्या सत्य प्रमाणित प्रती, आजपर्यंत दाखल करण्यात आलेले चेंज रिपोर्ट, ऑडीट रिपोर्ट, खर्चाचा तपशील, मिळालेल्या देणग्याबाबत तपशील (बँक खाते क्रमांक व नोंदीसह) तसेच सदर |

| | |
|---|---|
| | संस्थेविषयी आपल्या कार्यालयाकडे आलेल्या तक्रारी व तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तसेच आज रोजी संस्थेवरील कार्यकारी मंडळाची यादी संपूर्ण पत्ता व भ्रमणध्वनी व फोन क्रमांकासह, संपूर्ण माहिती व कागदपत्रांच्या सत्य प्रमाणित प्रती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.३०.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १५५१ चे नियम २३ प्रमाणे प्रमाणित नक्कत प्राप्त करुन घेणे बाबत सशुल्क तरतुद उपलब्ध आहे. त्यानुसार नक्कलेचा स्वतंत्र अर्ज देऊन आपणाला आवश्यक असणाऱ्या कागदपत्राचे नक्कल प्राप्त करावी असे कळविलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२७.०६.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य ठरवून प्रथम अपिल निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती दिली नाही. दिशाभूल करणारा खोटा व चुकीचा पत्रव्यवहार, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य दिसून येत आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२७.०६.२०२३ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. अपिलार्थी यांचा युक्तिवाद व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही.

अतः आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीयअपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

**जा.क्र.** 7362 **दिनांक :** 02/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३४१९/२०२४, ८६३/२०२४, ६३४७/२०२४ व ७०१७/२०२४**

**बोर्ड क्र.८५,८६,८९ व ९०-०४**

१. श्रीमती मंगला रायभान उघडे, — अपिलार्थी १ व २
२. श्रीमती सुरेखा कृष्णा पवार
सर्व रा. १४० रामकृपा कॉलनी (म्हाडा),
दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०५.२०२३,२९.०१.२०२४.१८.०६.२०२४ व ०४.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये चार द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी चार जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०२.२०२३ | अहवाल चे दि.०२.१२.२०२२ चा प्रमुख पत्र क्र.२०४२ जमा/कावी१५३८/२४२२ दि.०२.१२.२०२४ मधील मौजे मुलानी वडगाव ता. पैठण येथील स.न.६७/८ वरील फेरफार क्र.७८५ व १४३८ व इतर.. |
| १६.११.२०२३ | मा. उमविअ/फु अ/छ.संभाजीनगर कडे पत्र क्र.२६२३/अ/२०९/८९/११५४ दि.२३.०८.२०२३ हे आपल्या कार्यालर्यालयास व इतर.. |
| २३.०१.२०२४ | मा. उप वि.अ. पैठण फु. मु. छ. संभाजीनगर यांचे /आस्था/कावि/स्मरपणपत्र/दि.०१.०८.२०२० व अर्जदाराचे दि.३१.१०.२०२२ चे पत्र विषय रा.मा.आयोगाचे आदेश अपील क्र.३२९६/२०१७ आदेशा दिले अभिलेख गहाळ |

| | |
|---|---|
| | झाले असल्यास म.मा.अभिलेख अ.२००५ चे कलम ९ नुसार कार्यवाही बाबत सदर आदेश व संदर्भीय पत्रावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, कार्यालयीन टीप्पणी, संबंधीत दिलेले पत्र प्रति व त्यांच्या अहवालानुसार संपूर्ण माहिती |
| ०४.०४.२०२४ | मा. राज्य माहिती आयोगाचे आदेश अपील क्र.३८४/२०२३ अर्जदारो दि.०८.०१.२०२४ चे पत्र सदर आदेशातील कलम १९(८) (क) (दोन) नुसार केलेल्या कार्यवाही व मुळ अर्जातील संपूर्ण माहिती व अहवाल कार्यालयातील टीपणीसह सुस्पष्ट व अचुकपणे न्यायालयीन कामासाठी देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, श्री. रायभान किसन उघडे हे आता पत्नी व मुलीच्या नावाने अर्ज करतात. एखादा तक्रार अर्ज देतात आणि त्या अर्जावर काय कार्यवाही केली त्याबाबतची कार्यालयीन टिप्पणी आदेश व महाराष्ट्र अभिलेख अधिनियमानुसार कार्यवाही केली का असे विविध माहितीचे अर्ज करतात. त्यांना वेळोवेळी माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच आवश्यक माहितीचे अवलोकन करुन माहिती हस्तगत करावी, असे कळविले असता ते कार्यालयात अवलोनासाठी उपस्थित राहित राहीत. अर्ज [illegible] मात्र सारख करित राहतात. अपिलार्थी यांचे जवळपास आतापर्यंत ७०० ते ८०० माहितीचे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर वेळोवेळी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. प्रथम अपील सुनावणी देखील अनुपस्थित राहतात.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अद्याप अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती देण्याचा व प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे निदर्शनास आणून दिलेले आहे. पुढे असे निदर्शनास आलेले आहे की, अपिलार्थी हे पत्नी व मुलगी यांच्या नावाने अर्ज करुन वारंवार तीच माहिती व तक्रार अर्जावर काय कार्यवाही केली अशी माहिती मागितल्याचे युक्तिवादवरुन दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) मध्ये माहितीची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येनुसार माहिती तयार करुन, माहितीचे संस्करण करुन, इतर कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेऊन, लेखी, खुलासे वजा, स्पष्टीकरण मागणारी इ. माहिती देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीचा अर्ज ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त होतो, त्यावेळी जी माहिती त्यांच्या कार्यालयात ज्या स्थितीत उपलब्ध असते, ती माहिती त्याच स्थितीत अपिलार्थीस देय होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे चारही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

प्रकाश

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7363 दिनांक : 02/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १७४२/२०२४**
**बोर्ड क्र.८७**

श्रीमती मंगला रायभान उघडे, अपिलार्थी
रा. १४०, रामकृपा कॉलनी म्हाडा दर्गा रोड,
छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : उत्तरवादी क्र.१
अव्वल कारकून (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.११.२०२३ | मा. विभागीय आ.का.चे सोबतचे पत्र क्र.२०२२/मशाका/ज.क्र./कावी१८५० दि.२८.११.२०२२ पत्रातील अ.क्र.२ अर्ज दि.१४.११.२०२२ व अ.क्र.३ वरील अर्ज दि.२१.११.२०२२ वर केलेल्या कार्यवाही अहवाल कार्यालयीन टिपणीसह संपूर्ण माहिती व इतर.. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्यापी माहिती अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी तक्रार केलेल्या

अर्जावार कार्यलयाने काय कार्यवाही केली त्यांचा अहवालाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) मध्ये माहितीची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येनुसार माहिती तयार करुन, माहितीचे संस्करण करुन, इतर कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेऊन, लेखी, खुलासे वजा, स्पष्टीकरण मागणारी इ. माहिती देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीचा अर्ज ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त होतो, त्यावेळी जी माहिती त्यांच्या कार्यालयात ज्या स्थितीत उपलब्ध असते, ती माहिती त्याच स्थितीत अपिलार्थीस देय होते. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7364 दिनांक :- 02/07/2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४१४५/२०२४**
**बोर्ड क्र.८८**

श्रीमती मंगला रायभान उघडे, — अपिलार्थी
रा. १४० रामकृपा कॉलनी म्हाडा दर्गा रोड,
छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
तहसिलदार (महसूल),
विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपायुक्त (महसूल),
विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १८.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.१२.२०२३ | मौजे मुलानी वाडगाव ता. पैठण येथील जमीन सर्वे नं.६७/८ फेरफार क्र.१४३८, २०६२, २१६२,३१४१ व ३६८ तसेच फेर गट क्र.७८५,८१९,२३३६ च्या संपूर्ण संचिका नोंदनिकृत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०९.०१.२०२४ रोजी पत्रान्वये जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती देण्यात आलेली आहे . तसेच उर्वरीत माहिती करिता तहसिल कार्यालय, पैठण यांचेकडे कलम ६ (३) नुसार वर्ग करुन त्याची प्रत अपिलार्थी यांना पाठविलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०६.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य ठरवून अपिलार्थी यांचे प्रथम अपिल फेटाळलेले आहे, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्यापी माहिती अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय योग्य दिसून येत आहे. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०६.०३.२०२४ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र.- 7365 दिनांक :- 03/07/2025